# सेवक वार्ता

महाराष्ट्र दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

एप्रिल-२०२६

वर्ष -७ अंक-६

**सेवानिवृत्त वनकर्मचारी संघ, महाराष्ट्र परिवाराचे विविध उपक्रम, विचारमंथन, घडामोडी, साहित्य याचेसंवाद पत्र**


## श्री. सेलुकर, सचिव यांच्या सेवकच्या कामासाठी भेटी-गाठी

श्री रामाराव अप्रमुवसं यांची श्री. बी. व्ही. सेलुकर, यांनी भेट घेतली व त्यांना सेवक संघातर्फे ग्रीटिंग कार्ड दिले.

तसेच जैव विविधता मंडळाच्या कार्यालयात कार्यरत श्री. रवि वानखेडे,सेवानिवृत्त वन संरक्षक यांची भेट घेतली. सेवक संघासाठी काही कामे उपलब्ध होत असल्यास ती देण्याची त्यांना विनंती केली. तथापि सेवक संघातील अनुभवी अधिकाऱ्यांच्या योग्यतेचे काम उपलब्ध झाल्यास सेवक संघाशी संपर्क साधण्यात येईल असे आश्वासन त्यांनी दिले.

## डॉ.आर. बी. गिरी लिखीत "मेळघाटाचा बटवा" या पुस्तकविक्रीसभरघोषप्रतिसाद

एकूण छपाई केलेले पुस्तके २,०४०नग.

एकूण छपाई खर्च करा सह रुपये ८४००

पुस्तके विक्री करून प्राप्तएकूण रक्कम रु.१,०८,७३८पुस्तके विक्री तपशिल....

१९७७पुस्तके रु. ५४दराने प्राप्तरक्कम

३३ पुस्तकेरु.६०दरानेप्राप्तरक्कमरु.१९८०

एकुण रक्कम १०८७७३८.

एकूण पुस्तके विक्री२०१०.

मोफत वाटप– ३०पुस्तके

मेळघाटव्याघ्र प्रकल्प -२५पुस्तके.

श्री. गवळी यांचेमार्फतसंचालक, वनप्रशि. संस्था, पाल, जालना, चि'दरा, शहापूर, कुंडलयांनावाटप पुस्तके - ५

एकूण २०४०पुस्तके

पुस्तके छपाई खर्च करासह रु. ८४०००

निव्वळ नफारु.२४७३८झाला. यातील किमान ५०%नफ्याची रक्कम श्री गिरीयांना द्यावी अशी विनंती पत्की साहेब यांनीमध्यवर्ती कार्यकारणीस केलीअसतात्यासमान्यतादेण्यातआली.

## सेवकसंघाचेरामदास पुजारी व्हिएतनाममध्ये आंतरराष्ट्रीय साहित्य पुरस्काराने सन्मानित

सेवक संघाचेआजीवन सदस्य, सेवानिवृत्त सहायक वन संरक्षक, कवी, लेखक व कुंडल वन प्रबोधिनी येथे व्याख्याते पदावर कार्यरत राहिलेले बहुरंगी व्यक्तिमत्वाने वन विभागात सर्वज्ञात रामदास पुजारी यांचा २१ मार्च जागतिक वनदिनी व्हिएतनाम देशातील हनोई, येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय पुरस्कारदेऊनसन्मान करण्यात आला. त्यांच्या अनेक वर्षाच्या साहित्य, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्यासेवाभावी योगदानासाठी सहाव्या आंबेडकरवादी विश्व साहित्य संमेलनात जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळाद्वारे त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

"आई माझं जग", "उद्याच्या श्वासासाठी"," खोल मनाच्या तळाशी" हे काव्यसंग्रह व "पर्यावरणविषयक घोषवाक्ये" ही पुस्तिका अशी त्यांची लेखन संपदा असून त्यांनी विविध वृत्तपत्रे, नियतकालिके, प्रसार माध्यमांतून लेख, कविता, घोषवाक्ये, व्याख्याने, आकाशवाणी, दूरदर्शनवरील भाषणे यांच्या माध्यमातून पर्यावरण जन जागृतीचे कामी महत्त्वाचे योगदान दिलेले आहे. या साहित्य संमेलनात त्यांनी त्यांचे विचारमांडले. मानवी भविष्यासाठी, भरभरून देणाऱ्या निसर्ग व पर्यावरणाच्या रक्षणासाठी सर्वांनी सर्वतोपरी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांचे या सेवाभवी कार्यातून सेवक संघाच्यावन, पर्यावरण संवर्धन विषयक कामात हातभार लागत आहे.

## " रानफुले " या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा

डॉ. शेषराव हिम्मतराव पाटील सेवानिवृत्त प्रधान मुख्य वनसंरक्षक वसेवकसंघाचेकार्यकारीअध्यक्षयांच्या रानफुले या कविता संग्रहाचे प्रकाशन बुधवार दि. 22 एप्रिल रोजी प्राध्यापक डॉ. विठ्ठल वाघ, प्रसिद्ध साहित्यिक व लोककवी यांच्या हस्ते व श्री आशिष ठाकरे वनसंरक्षक (प्रादे.) पुणे वनवृत्त यांच्या अध्यक्षतेखाली पुणे येथे झाले.सदरकार्यक्रमासअनेकजेष्ठवनअधिकारीउपस्थितहोते. सदर कार्यक्रमाचे निवेदन श्री रामदास पुजारी सेवानिवृत्त सहाय्यक वन संरक्षक, लेखकव कवी यांनी केले. सदर पुस्तकाचे प्रकाशन साहित्य विश्व प्रकाशन, पुणे यांचे मार्फत करण्यात आले.त्यानिमित्ताने हार्दिक अभिनंदन.

# "माझे मत"

## सेवानिवृत्त वन अधिकारी यांच्या अनुभवाचा वन विभागाला कसा व कुठे उपयोग करून घेता येईल?

### वन नीती, वन कायदे, वन व्यवस्थापन प्रणालीबदलांकामीसेवानिवृत्तांचासहभाग

✍ विठ्ठल पत्की, से.नि.वनसंरक्षक.

सेवानिवृत्त वन कर्मी यांचे ज्ञान,अनुभव आणि विद्वत्ता यांचा पूर्ण आदर राखून,मी विचार व्यक्त करीत आहे.

सेवेतील आणि सेवानिवृत्त वन कर्मी व अधिकारी यांनी प्रथम यावर गंभीर विचारमंथन करणे जरुरी आहे की, १८६४ पासून २०२५ पर्यंत आपल्या कार्य शैलीने खरोखरचं वनांचे संरक्षण,विकास झाला आहे कां ?वनबहुल समाजाचा विकास करण्यात वन विभागाचे योगदान काय आहे ?समाजात व जनतेत वन विभागाची प्रतिमा कशी आहे ?माझे मते,आपण सगळे यात नापास झाले आहोत.आपली वन नीती,वन कायदे,वन व्यवस्थापन प्रणाली यात आमूलाग्र बदल करणे नितांत आवश्यक आहे.वन विभागाचे मित्र कुणीही नाहीत,सगळे शत्रुत्व भावनेने आपल्याकडे बघतात.मग ते राजकारणी असोत,लाभार्थी असोत,पत्रकार असोत किंवा न्याय करणारे असोत,काही अपवाद वगळता हे मान्य करण्यात संकोच करू नये असे माझे मत आहे.यामुळेआपण नामर्द किंवा कार्यक्षम नाही असे नाही.मनोवृत्ती बदलली पाहीजे.सेवेतील वनकर्मी व अधिकारी यांची मनोवृत्ती बदलणे हे सोपे काम नाही किंवा पटकन होईल असे ही नाही. सेवानिवृत्त वन अधिकारी यांनी प्रथम आपली विचार -सरणी बदलून,या शुभ कामाचा आरंभ केल्यास एक क्रांती होईल.

******

### नवेगांव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्राचेव्यवस्थापने विषयीअनुभवांचावापर

✍ अ.श्री.खुणे,से.नि. वि.व.अ.

तब्बल ४५ वर्षांपासून मी प्रसिद्ध नागझिरा क्षेत्राचा अनुभव घेत आहे. या कालावधीत मी वनक्षेत्रपाल, सहायक वनसंरक्षक तसेच उपसंचालक या पदांवर कार्य केले आहे. पूर्वी ताडोबा व नागझिरा ही दोन्ही व्याघ्र दर्शनासाठी प्रसिद्ध क्षेत्रे होती. एखाद्या वेळी ताडोबामध्ये वाघ दिसला नाही, तर नागझिरामध्ये नक्कीच दर्शन होत असे; मात्र सध्याची परिस्थिती लक्षणीयरीत्या बदललेली आहे. आज ताडोबामध्ये ८० पेक्षा अधिक वाघ असल्याचे दिसून येते, तर नागझिरामध्ये ही संख्या ८ च्याही खाली असल्याची स्थिती आहे.

सध्या कोअर व बफर क्षेत्र मिळून दोन्ही व्याघ्र राखीव क्षेत्रांचे क्षेत्रफळ जवळपास समसमान असतानाही ही तफावत का निर्माण झाली आहे, याबाबत माझे पुढीलप्रमाणे मत आहे.

मी कार्यरत असताना, नवीन नागझिरा अभयारण्य फेब्रुवारी २०१२ मध्ये आणि कोका अभयारण्य जुलै २०१३ मध्ये घोषित करण्यात आले. त्यानंतर डिसेंबर २०१३ मध्ये कोका, नवीन नागझिरा, नागझिरा अभयारण्य तसेच नवेगांव राष्ट्रीय उद्यान व नवेगांव अभयारण्य या दोन स्वतंत्र ब्लॉक्सना एकत्रित करून नवेगांव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र घोषित करण्यात आले.

ताडोबा व नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्रांची तुलना करता, ताडोबा हे जवळपास एकसंध (कॉम्पॅक्ट) क्षेत्र आहे; तर नागझिरा हे पश्चिम–पूर्व व दक्षिण दिशेत सुमारे ९४ किमी लांब पसरलेले असून त्याची रुंदी केवळ ५ ते १२ किमी दरम्यान आहे.

मुख्य कारणे पुढीलप्रमाणे आहेत:

१) क्षेत्राची रचना लांबट व विस्कळीत असल्याने वाघांचे स्थलांतर राखीव क्षेत्राबाहेरील भागांकडे मोठ्या प्रमाणावर होते.

२) कोका अभयारण्य ते नागझिरा परिसरातील उत्तर व दक्षिण भागात सुमारे ३०–३५ गावे असून, त्यापैकी ७–८ गावे ६६ केव्ही विद्युत लाईनद्वारे बेकायदेशीर शिकारीसाठी कुप्रसिद्ध आहेत. अशा प्रकारच्या शिकारींपैकी वन विभाग केवळ सुमारे १०% प्रकरणांचीच उकल करू शकतो, तर उर्वरित ९०% प्रकरणे अनुत्तरीत राहतात. या प्रकारच्या शिकारीमुळे वाघ, बिबट, अस्वल, रानगवा इत्यादी वन्यप्राण्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

३) नागझिरा परिसरात महाडोर, रानतुळस व मेढसिंघी यांसारख्या अखाद्य वनस्पतींनी अनेक कक्ष व्यापलेले आहेत. तसेच वन विकास महामंडळाच्या पूर्वीच्या क्षेत्रांचा (सध्या कोका व नवीन नागझिरा मध्ये समाविष्ट) विचार करता, सुमारे १२०० हेक्टर क्षेत्रात नवीन साग रोपवने आहेत. या क्षेत्रात आवश्यक ते विरळणीकरण (thinning) व स्वच्छता (cleaning) कामे झालेली नाहीत. परिणामी, काटेरी झुडपे व अखाद्य वनस्पती इतक्या प्रमाणात वाढल्या आहेत की त्या भागात मानवी हालचाल करणेही अत्यंत कठीण झाले आहे.

४) कोका व नवीन नागझिरा मिळून एकूण २५,१०० हेक्टर क्षेत्रापैकी केवळ ८३ हेक्टरमध्येच कुरणे उपलब्ध आहेत. त्यामुळे गवत खाणाऱ्या प्रजातींची संख्या अत्यल्प आहे. परिणामी, अन्नसाखळीचा समतोल बिघडलेला आहे.

जोपर्यंत गाभा क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर कुरण विकास, अखाद्य वनस्पतींचे उच्चाटन, वन विकास महामंडळाच्या क्षेत्रात विरळणीकरण व स्वच्छता, चितळ प्रजातीचे पुनर्प्रवेश (introduction) तसेच शिकारीवर

प्रभावी नियंत्रण केले जाणार नाही, तोपर्यंत नवेगांव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्रात वाघांची संख्या वाढणे अत्यंत कठीण आहे.

********

## ज्ञानाचा व अनुभवाचा वन विभागाला निश्चितपणे उपयोग होऊ शकतो, याकरिता.....


बाळकृष्ण तांबट

से.नि. स. व.सं., नाशिक


सेवानिवृत्त वनकर्मी यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा वन विभागाला निश्चितपणे उपयोग होऊ शकतो असे माझे मत आहे. सामाजिक वनीकरण विभागांमध्ये काही वर्षांपूर्वी विभाग वृत्त स्तर व राज्य स्तरावर चर्चासत्रे आयोजित करण्यात येत होती त्यामध्ये वेगवेगळ्या मान्यवरांना बोलावून त्यांचे मार्गदर्शन घेतले जात होते. त्याप्रमाणे सेवा

निवृत्त वनकर्मींचा अनुभवाचा व ज्ञानाचा उपयोग करून घेता येऊ शकेल असे मला वाटते. याकरिता ज्यावेळी विभाग स्तरावर मासिक बैठक असेल त्यावेळी तेथील सेवानिवृत्त वन कर्मींना माहिती घेऊन मीटिंग संपल्यावर तास दोन तास त्यासाठी वेळ नेमून देऊन त्या ठिकाणी असलेल्या सेवा निवृत्तांना मार्गदर्शनासाठी बोलविता येऊ शकेल. हा कार्यक्रम सातत्याने चालू ठेवण्यासाठी वरिष्ठ स्तरावरून उपाययोजना करणे आवश्यक आहे. याकरिता सविस्तर योजना आखण्यासाठी इच्छुक असलेल्या सेवानिवृत्त वनाधिकाऱ्यांची एक बैठक आयोजित करून त्यात सविस्तर चर्चा करून एक योजना तयार करून मग ती कार्यान्वित करता येऊ शकेल.

मी सहाय्यक वनसंरक्षक या पदावरून १ मार्च २००१ या दिवशी सेवानिवृत्त झालेला आहे. तत्पूर्वी मी वन विभाग सामाजिक वनीकरण विभाग आणि वन विकास महामंडळ वन्यजीव संरक्षण विभाग या विभागांमध्ये काम केलेले आहे आणि सेवा कालावधीमध्ये भरपूर अनुभव घेतलेला आहे आणि त्याचा उपयोग येणाऱ्या पिढीसाठी भावा अशी माझी मनापासून इच्छा आहे. आणि त्यासाठी मी या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी तयार आहे. कृपया माझ्या या विनंतीचा आवश्यक तो विचार व्हावा

# वन सान्निध्याची साठी


✍ विठ्ठल त्र्यंबक पत्की


प्रस्तावना. १



माझा परिचय -

माझे नाव विठ्ठल यशोदा त्र्यंबक पत्की असून, माझा जन्म दि. २७-०७-१९४३ रोजी ठाणे येथे झाला. त्या दिवशी दुसरी आषाढी एकादशी (कामिका एकादशी) होती, म्हणून माझे नाव "विठ्ठल" ठेवले गेले. विठ्ठलाचे गुण माझ्यात आहेत किंवा नाहीत हे मला ठाऊक नाही, परंतु कटीवर दोन्ही हात ठेऊन उभे राहण्याची किमया मी अनेक वेळा करितो असे माझी पत्नी कै. वैशाली कौतुकाने म्हणायची. माझे वडिल कै. त्र्यंबक विठ्ठल पत्की पोलीस खात्यातून सबइन्स्पेक्टर पदावरुन १९४३ मध्ये वयाच्या ५५ व्या वर्षी नियत वयमानाने निवृत्त झाले. त्याना पेंशन दरमहा रु.४०/- मिळत असे. १९५०.

साला पर्यंत आमचे एकत्र कुटूंबात आम्ही एकूण १३ सदस्य होतो.

काका-परशुराम चुलत भाऊ-उध्दव

वडील-त्र्यंबक आई- यशोदा

ज्येष्ठ सावत्र भाऊ-चंद्रकांतज्येष्ठ सावत्र बहिण- चंपावती

ज्येष्ठ सख्खी बहिण-प्रभावतीज्येष्ठसख्खाभाऊ- श्रीनिवास

सख्खी बहिण-पुष्पलता सख्खी बहिण- सुमती

मी-विठ्ठलसख्खा भाऊ- श्रीकांतसख्खा भाऊ - अनिल

१९४३ साली चंद्रकांत पोलीसात हवालदार पदावर कार्यरत होते.आणि चुलतभाऊ उध्दव यांचे पुण्यात, नागेश पेठेत टेलरिंगचे दुकान होते. कमाविणारे ३ आणि खाणारे १३ जण होतो.

वडिलांचे सेवानिवृत्तीनंतर उध्दव, चंद्रकांत, चंपावती आणि श्रीनिवास सोडून उर्वरित ९ सदस्य गावी आलो. सुदैवाने ,पूर्वजांनीउभारलेलाचौसोपी वाडा, जरी मोडकळीस आला होता, तरी निवारा देण्यास उपलब्ध होता. माझी आई (यशोदा) आणि काका (परशुराम) सर्व घर आणि जनावरे (गाई-म्हशी, कोंबड्या) सांभाळायचे. जरी दूध-दुभते घरचे होते, तरीहीखाण्याची एकंदरीत आबाळ होती. गरीबीवर औषध त्या काळात नव्हते. साधा आहार मिळे. नाष्ट्याला तांदुळाची पेज, दुपारच्या भोजनात भात, आमटी, ताक, खारातली मिरची असायची, तर रात्रीच्या भोजनात कधीतरी तांदुळ/नागलीची भाकरी असायची.

सकाळी ६ पूर्वी सगळे उठून तयार असायचे. रात्री ९ चे आत चिडीचूप. गावात वीज नव्हती. कंदीलाचा व माजघरातील समईचा तेवणारामंद प्रकाश उर्जा देत असे. डास येऊ नयेत म्हणून निरगुडीच्या पाल्याचा धूर केला जायचा. चंद्रकांत (नाना) दर महिन्यास रु. वीस मनिआर्डरने पाठवित असे. शेत जमिनीत थोडेफार भात, नागली, वरई, कारळे, पावटा पिकत असे. शेतीतील पीक खावटीस पुरत असे. महिन्यातून एकदा कोंबड्याची सागुती आणि आठवड्यातून एकदा आमलेटचा आनंद मिळत असे. काका जंगलातून करांदे जमा करुन आणित, त्यांना चुलीत भाजून, सोलून आम्ही आवडीने खात होतो. हंगामात शेवळं मिळायची. त्यांची रस्सेदार भाजी होत असे. उन्हाळ्यात कच्च्या फणसाची भाजी आणि पावसाळ्यात टाकळा, अंबाडी, भारंगी, शेवगा, शतावरी, चवळई मिळत असे. भाद्रपदात गाई-म्हशी व्यायल्या की खरवसाची फीस्ट असे. जून-जुलै मध्ये खेकडे/चिंबोरीचे कालवण ३-४ वेळा उपलब्ध होत असे. तांदळाच्या रव्यात बरका फणसाचा रस घालून इडली सारखी सांदणे केली जायची, गणपती सणात

तांदळाच्या उकडीतील गुळाचे मोदक, तर होळीत पुरणपोळी आणि कटाची आमटी तयार व्हायची. श्राध्द महाल पक्षात घारगे, वडे व खीर असे. दिवाळी सणात गुळपोहे, दहिपोहे, कांदापोहे, कडबोळी, चकली, बेसन लाडू, कणकेचे लाडू यांची मेजवानी असे. नैसर्गिक पिके, शुध्द हवा, पायी चालण्याचा व्यायाम,ताण-तणाव विरहीत जीवनशैली यामुळे आजारपण दुर्मिळ असे. झाड-पाल्यांचे आयुर्वेदीक उपचार प्रचलीत होते.

आई-वडिलांपेक्षा मला काकांचा लळा जास्त होता. माझे काका जेमतेम चौथी पर्यंत शिकलेले होते, परंतु त्यांना ३० पर्यंत पाढे, पावकी,निमकी, पाउणकी, सवाईकी, दिडकी, औटकी मुखोदगत होती. सर्व आरती तोंडपाठ होत्या. ते उत्तम, चविष्ट स्वयंपाक करायचे. अत्यंत मायाळू वृत्तीचे ते होते. वडिलांचे मोडी भाषेवर प्रभुत्व होते. माझी आई मात्र आयुष्यभर दोन नऊवारी लुगडी व दोन झंपर या कपड्यांवर समाधानी असायची. चूल, फुकणी व मुले यांच्यात ती रममाण असे. तिने आयुष्यात कुणाकडेही कसलीच मागणी केली नाही. असे आई-वडिल, काका, भाऊबंद मिळण्यास पूर्वजन्मी चे पुण्य असावे लागते.

**माझे प्राथमिक शिक्षण-**

आता माझे शालेय शिक्षणाचे वय झाले होते, म्हणून १९४८ साली माझी रवानगी प्रभानवल्लीहून पुण्यास करण्यात आली. काका मला पुण्यास घेऊन आले. पुण्यात आम्ही आगरकर हायस्कूल समोरील दांडेकर यांचे वाड्यात भाडोत्री होतो. भाडे दरमहा रु.१०/- होते. यातील कुटुंबात उध्दव, चंपावती, श्रीनिवास आणि मी होतो. जवळच्या सरदार लक्ष्मीबाई रास्ते प्राथमिक विद्यालयात शिक्षणाचा प्रारंभ झाला. ही शाळा पहिली ते चौथी पर्यंत होती. बहुतेक शिक्षिका महिला होत्या, फक्त संगीत शिकविण्यासाठी पुरुष शिक्षक होते. माझ्या बाल मनावर संस्कारांचे बीज रोवणाऱ्या दोन महान शिक्षिकांनी माझे जीवनास दिशा आणि वळण दिले. त्यांचा परिचय करुन देणे हे माझे आद्य कर्तव्य आहे.

माझे आद्य कर्तव्य आहे.

**श्रीमती फलटणकर बाई-**

या बाल विधवा होत्या. सुमारे १५७ सैमी उंची, अंगाने मध्यम, वर्णानेसावळ्या होत्या. नऊवारी सुती लुगडे व पांढरा झंपर वेश त्या परिधान करित असत. करुणामय नयन, ममता व दया त्यांचे चेहऱ्यावर ओसंडून जायची. जीव ओतून त्या शिकवीत असत. एकदा, मी तापाने फणफणलो असल्याने तीन दिवस शाळेत जाऊ शकलो नाही. तिसऱ्या दिवशी सायंकाळी फलटणकर बाई माझी विचारपूस करणेसाठी घरी आल्या. माझे अंगात सुमारे १०३० फॅ. ताप होता व मी ग्लानीत डोळे बंद करुन पडलो होतो. माझी मोठी ताई (चंपावती) माझे कपाळावर मीठाच्या थंड पाण्याच्या घड्या ठेऊन, तापमान नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न करित होती. तिने मला हळूच कानात सांगितले "विजू डोळे उघड, तुला पहायला कोण आले आहे बघ. मी किलकिल्या डोळ्याने पाहिले, तर समोर फलटणकर बाई प्रेमळ करुणामयनजरेने माझेकडे पहात होत्या. मला खूप आश्चर्य वाटले आणि अतीव आनंद पण झाला. मी, अंथरुणातून उठण्याचा प्रयत्न करित असतांनाच फलटणकर बाईंनी माझे कपाळावर हात फिरवून म्हणाल्या "उठू नकोस, तुझ्या अंगात ताप आहे, लवकर बरा हो, तुझा बुडालेला अभ्यास मी घरी येऊन शिकवीन". माझ्या आनंदास पारावार उरला नाही. त्यांनी येताना माझेसाठी खाऊ म्हणून नानकटाईची बिस्कीटे आणली होती. केवढी ममता, औदार्य, प्रेम, सहानुभूती? मोजणे शक्य नाही. आदर्श वर्तणुक कशी असावी याचे बाळकडू त्यांनी मला पाजले होते. गुरु-शिष्याच्या नात्यातील शिदोरी त्यांनी मला दिली होती, जी अजूनही मला पुरली आहे.

## सौ. मोडक बाई -

या मला तिसरी व चौथीस शिक्षिका होत्या. उंची जेमतेम १५० सें.मी., गौर वर्ण, कपाळावर भलेमोठे कुंकू, जाड भिंगाचा चष्मा, नऊवारी हिरव्या रंगाचे लुगडे व त्याच रंगाचे झंपर हा आवडता वेश. करारी मोठे डोळे, करडा आवाज. अतिशय कर्तव्यदक्ष आणि शिस्तशीर. त्यांचा मुलगा गोपाळ माझे वर्गातच होता. एकदा गोपाळ पाच मिनीटे उशीरा वर्गात आला. आता बाई काय करतात याकडे सर्व मुले पहात होती. सर्वसाधारणतः अशा प्रसंगी मोडक बाई विद्यार्थ्यांना पाच मिनीटे अंगठे धरुन उभे राहण्याची शिक्षा देत होत्या, परंतु त्यांनी गोपाळला हीच शिक्षा दहा मिनीटे कालावधीची दिली होती. सर्व मुलांना आश्चर्य वाटले आणि त्यांना न्यायप्रियतेचे संस्कार कसे करावेत यांचा बोध मिळाला. गणित विषय शिकविण्यात त्यांचा हातखंडा होता. मोडक बाईंची ही शिकवण मला प्रशासनात बहुमूल्य उंचीवर घेऊन गेली.

**माझे माध्यमिक शालेय शिक्षण -**

१९५२ साली प्राथमिक शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर, माध्यमिक शिक्षण (५ वी ते ११ वी) साठी मी, राजा धनराज गिरजी हायस्कुल मध्ये प्रवेश घेतला. ताराचंद इस्पितळासमोरील जागेत ही दोन मजली दगडी बांधकामाची वास्तु होती. कै. प्रल्हाद केशव अत्रे यांनी स्थापन केलेल्या न्यू कैंप एज्युकेशन संस्थेची ही शाळा होती. गरीबांची शाळा म्हणून प्रसिध्द होती. फी अत्यंत अल्प होती. ११ वीत फी दरमहा रु. तीन होती. ती भरणे पण अनेक पालकांना जड वाटे. शिक्षक मात्र नामवंत व प्रख्यात होते. मराठी विषय श्री. ह. भा. वाघोलीकर सर अत्यंत तळमळीने शिकवीत. काही वर्षे हा विषय श्री. द. मा. मिरासदार सर शिकवीत होते. मिरासदार सरांची ओळख करुन देण्याची गरज नसावी. शास्त्र आणि बीजगणित व भूमिती विषय श्री. किशाभाऊ पटवर्धन सर शिकवीत. कमी बुध्दी असलेल्या विद्यार्थ्याने चूक केली तर, ते सौम्य शिक्षा करित, परंतु बुध्दिमान विद्यार्थ्याने चूक केली तर कठोर शिक्षा करित. हुषार विद्यार्थ्यांना (निवडक ५-६ जणांना) ते दर रविवारी टिळक रस्त्यावरील आपले घरात बोलवून विशेष कोचिंग विनामूल्य करिता असतं. याच सरांनी स्वरूपवर्धिनी ही शाळा स्थापन केली. अंकगणित विषय श्री. के. बी. कुलकर्णी सर सहजगत्या सोपा करुन शिकवीत असत. श्री. वि. कृ. क्षोत्रिय सर (हेडमास्तर) संस्कृत विषय सुलभ करुन शिकवीत असत. ११वीचे बोर्डाचे परिक्षेची फोर्म फी फक्त रु.१६/- होती. १९५९ मे मध्ये मी ११ वी परिक्षा सेकंड क्लासमध्ये उत्तीर्ण झालो. मी ड्राफ्ट्समन म्हणून नोकरीस लागावे अशी माझ्या वडिलांची इच्छा होती, परंतु मी पदवीचे शिक्षण घ्यावे अशी माझे चुलत बंधू

(उध्दव) यांची प्रखर इच्छा होती. आता मी १६ वर्षांचा झालो होतो.

**माझे महाविद्यालयीन शिक्षण-**

१९५९ साली मी पुण्याच्या शेतकी महाविद्यालयात पदवी शिक्षणासाठी प्रवेश घेतला. शेतीचा सातबाराचा उतारा जोडला तर, प्रवेशासाठी २०% जास्तीचे गुण विचारात घेतले जात होते. सातबारा उतारा प्राप्त करण्यासाठी वडिल तलाठ्याचे शोधात फिरत होते. मोठ्या मुष्कीलीनेउतारा मिळाला. कोकणात जूनच्या पहिल्या आठवड्यात मुसळधार पाऊस सुरू होतो, त्यामुळे उतारा वेळेवर पुण्यास पोहचावा म्हणून वडिलांनी साखरपा येथे जाऊन उतारा पोस्टाने पाठविला. या धावपळीमुळे त्यांना ४-५ दिवस घराबाहेर रहावे लागले. घरातील मंडळी काळजीत होती, पण कार्य ईश्वरी कृपेने सुखरुप पार पडले.

जून १९५९ मध्ये प्रथम वर्ष शिक्षण सुरु झाले. सकाळी ७.३० ते १२.०० व दुपारी १३.१५ ते १६.१५ पर्यंत शिक्षणसत्रे असायची. घरापासून महाविद्यालयात सायकलने जाण्यासाठी २० मिनीटे लागायची.मी रोज सकाळी ७.०० वा. निघून ७.२०ला पोहोचत असे. परत १२.०० निघून १२.२०ला घरी येत असे. भोजन करुन, परत १२.५० ला निघून पोहचत असे. रोज वीस किलोमीटर सायकलींगमुळे दीर्घायु लाभले. माझे महाविद्यालयीन शिक्षण समयबध्द कालावधीत पार पाडण्यात माझी मातृवत वहिनी (उध्दव यांची पत्नी, मंगला) यांचा सिंहाचा वाटा होता. कै. मंगला वहिनी सुगरण होत्या व त्यांना शिक्षणाची प्रचंड आवड होती. १९५१ साली विवाहानंतर त्यांनी हिंदीच्या कोविद पर्यंतच्या चार परीक्षा उत्तीर्ण केल्या होत्या. त्यासाठी त्या दररोज चार किलोमीटर पायपीट करित असत. त्या देवभक्त होत्या. दररोज सायंकाळी कसबा पेठेतील गणपती मंदिरात त्या पुराण ऐकायला जायच्या.

माझे दुर्देवाने प्रथम वर्ष परिक्षेत मला ५९% गुण असूनही, केवळ Agronomy Practical विषयात मी अनुत्तीर्ण झाल्याने, माझे एक वर्ष वाया गेले. माझे नशिबाने मला खट्याळ बैलजोडी नांगरटीसाठी मिळाल्याने, मी उद्दीष्ट वेळेत पूर्ण न केल्याने, नापास झालो. परंतु, नाराज न होता परत अभ्यास कर अशी उमेद मला भाऊ आणि वहिनींनी दिल्याने मी कृषि पदवी पाच वर्षांत प्राप्त केली.

**कृषी विभागातील सेवा-**

पदवीचा अंतीम निकाल लागण्याचे आधी मला कृषी विभागात तीन पदस्थापनेचे आदेश प्राप्त झाले होते. पहिला आदेश कृषी पर्यवेक्षक, गहू संशोधन केंद्र, निफाड. दुसरा आदेश कृषी पर्यवेक्षक, मृदसंधारण विभाग, दौंड. तिसरा आदेश कृषी पर्यवेक्षक, भात संशोधन केंद्र, कर्जत. मी, भात संशोधन केंद्र, कर्जत येथे रुजू झालो. कृषी विभागाची विभागीय परीक्षा पण मी चार महिन्यांत उत्तीर्ण झालो. कर्जत येथे माझे बॉस श्री.जी. आर. तत्ववादी होते. हे आपले श्री एच.एन. तत्ववादी यांचे काका व श्री. सतीश एलकुंचवार यांचे सासरे होते. एके दिवशी त्यांनी मला विचारले की "तुम्ही पुढे काय करणार?" मी प्रांजल उत्तर दिले की "नोकरी, आणि संधी मिळाली तर संशोधनाने M.Sc. (Agri). "त्यावर त्यांनी मला सांगीतले की "कृषी खात्यात तुमचे भविष्य अंध:कारमय आहे. आमचा एक पुतण्या वन विभागात रेंजर आहे. काय रुबाब आहे त्याचा? तुम्ही पणप्रयत्न करा." मी त्यांना प्रयत्न करीन असे आश्वासन देऊन सुटका करुन घेतली. कर्मधर्म संयोगाने त्याच आठवड्याच्या रविवारी टाईम्स ऑफ इंडियात एक जाहीरात आली. ही. जाहीरात MPSC ची होती, ACF निवडीसाठी. ही जाहीरात,मी तत्ववादी साहेबांना दाखविलीव त्यांचा सल्ला विचारला.ते म्हणाले की "आमच्या पुतण्याचे मूळ वेतन रु.१९०/- आहे. परंतु या पदाचे मूळ वेतन रु.३२०/- आहे. मोठी पोस्ट दिसते, प्रयत्न करुन पहा.

(क्रमशः)

------- --------

*स्मृतीतील कोरीव असे काही....*

## कोयनानगरचा भूकंप

### ताबाजी बिरदवडे

हा प्रसंग माझ्या सेवा-जीवनातील अत्यंत धक्कादायक आणि स्मरणीय अनुभव ठरलाः आपत्तीच्या काळात प्रशासन, वनविभाग आणि स्थानिक नागरिक यांच्यातील समन्वय किती महत्वाचा असतो, याची जाणीव या घटनेतून प्रकर्षाने झाली. भूकंपानंतर पाच-सहा दिवसांनी महाराष्ट्राचे मुख्य वनसंरक्षक श्री. बुट, साहेब पाहणीसाठी आले. त्यांच्या समवेत मला कोयनानगर येथे जाण्याची संधी मिळाली. त्यावेळी कोयनानगरचा संपूर्ण परिसर संरक्षण खात्याच्या अधिकाऱ्यांच्या ताब्यात होता. परिसराची पाहणी करताना मोठ्या प्रमाणावर झालेली पडझड स्पष्टपणे दिसून येत होती. अनेक इमारती जमीनदोस्त झाल्या होत्या. हेलबाग गावातील पूल पूर्णतः नेस्तनाबूत झाला होता. सर्वत्र भीती, अस्वस्थता आणि विध्वंसाचे चित्र दिसत होते.

त्या वेळी आमच्यासोबत पुणे वनवृत्ताचे वनसंरक्षक श्री. मुंडकूर साहेबही होते. योगायोग असा की, भूकंपाच्या आदल्या दिवशीच मी त्यांच्यासमवेत मेढा येथील रोपवनाची पाहणी केली होती. त्याच दिवशी सायंकाळी श्री मुंडकूर साहेब कोयनानगरकडे रवाना झाले होते. दुसऱ्याच दिवशी पहाटे हा भूकंप झाल्याने परिस्थितीने अचानक भीषण वळण घेतले.

ही घटना नियतीच्या अनिश्चिततेची जाणीव करून देणारी होती. एका दिवसात परिस्थिती किती बदलू शकते, याचा हा जिवंत अनुभव होता. माझा मुक्काम पाचश्वाशी येथे होता, तर श्री. मुंडकूर साहेब कोयनानगर येथे मुक्कामी होते. भूकंपानंतरची परिस्थिती त्यांनी मुख्य वनसंरक्षक श्री. बूट साहेबांना सविस्तरपणे सागितली.

ते सांगताना म्हणाले, "मी साताऱ्यावरून कोयनानगर येथे पोहोचायला उशीर झाला. त्यामुळे विश्रामगृहात माझ्यासाठी आरक्षित केलेला कक्ष मला मिळाला नाही आणि त्यालगतच्या दुसऱ्या कक्षात मला मुक्काम करावा लागला. सुदैवाने माझ्यासाठी राखीव ठेवलेला मूळ कक्ष भूकंपात पूर्णपणे कोसळला. त्या क्षणी मला प्रकर्षाने जाणवले की, मी केवळ योगायोगाने भयंकर आपत्तीतून वाचलो."

भूकंप होताच श्री मुंडकूर साहेबांनी तात्काळ मदतकार्य सुरू केले. त्यांनी सांगितले की, विश्रामगृहाच्या कक्षाबाहेर येताच त्यांनी स्वतःच जीप चालवत वनरक्षक व वनपाल यांच्यानिवासस्थानाकडे धाव घेतली. त्या ठिकाणी मोठा आरडाओरडा, गोंधळ आणि भीतीचे वातावरण पसरलेले होते. सर्वत्र हल्लकल्लोळ माजला होता. त्या प्रसंगी त्यांनी अत्यंत धैर्याने परिस्थितीचा सामना करत मदतकार्याला दिशा दिली.संकटाच्या क्षणी नेतृत्व आणि तत्परता किती महत्त्वाची असते, याचा तो जिवंत अनुभव होता. त्या गोंधळाच्या परिस्थितीत श्री. शिलवंत

वनपाल यांच्या कन्या आणि पत्नी या गंभीर झालेल्या आढळल्या. त्यांना तातडीने घराबाहेर सुरक्षित स्थळी आणण्यात आले. एक-दोन वनरक्षकांना सोबत घेऊन आम्ही आमच्या विभागातील अधिकारी व कर्मचारी राहत असलेल्या निवासस्थानांकडे धाव घेतली. श्री. भीमराव घाडगे, प्रशिक्षित वनक्षेत्रपाल यांच्या निवासातगेलो असता ते कॉटवरून खाली पडलेले दिसले. त्यांच्या मांडीला गंभीर दुखापत झालीहोती. सर्वत्र निर्माण झालेली भीषण परिस्थिती पाहता जखमी कर्मचाऱ्यांना तात्काळ दवाखान्यातठेवण्याची व्यवस्था करण्यात आली. यानंतर श्री बूट साहेबांसोबत असलेले सर्व वनअधिकारीआणि मी स्वतः सातारा येथे परतलो. साताऱ्यात श्री. बूट साहेबांनी सर्व अधिकाऱ्यांचेऐकून पुढील कार्यवाहीबाबत स्पष्ट सूचना दिल्या. त्यांनी सांगितले की, पुढील एक-दोनदिवसांत भूकंपग्रस्त ग्रामस्थांच्या मदतीसाठी बांबू व वासे (लाकडी साहित्य) पाठवण्यातयेतील. हे मदतकार्य महसूल खात्याच्या सहकार्याने तत्परतेने आणि सुसूत्रपणे राबविण्याचीव्यवस्था करावी.

आपत्तीच्या त्या कठीण काळात वनविभागाने केवळ वनसंवर्धनापुरते मर्यादित न राहतासामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून मदतकार्याची धुरा सांभाळली.याचा मला अभिमान वाटला. कोयनानगर येथे झालेल्या भूकंपामुळे सुमारे पंचवीस ते तीसअकिमीपरीसरातील गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर घरांची पडझड झाली होती. अनेक कुटुंबे उघड्यावर आली होती. त्यामुळे भूकंपग्रस्त ग्रामस्थांना तात्काळ मदत पुरवणे आवश्यक बनले होते. अन्न, कपडे, अंथरूण-पांघरूण, भांडी-कुंडी तसेच इतर जीवनावश्यकवस्तूंचा देशाच्या विविध भागांतून मदतीचा ओघ सुरू झाला. संकटसमयी देशभर झालेली सहवेदना आणि मदतीची भावना अत्यंत हृदयस्पर्शी होती.

---

## Working Plans and Collector....

### A funny incident funny incidence of North and South in forest department.

N. A. Patil, ACF (Retd)

This happened during 1993 when I was working as Sub Divisional Forest Officer, Rajura in CentralChanda Division.The work of revision of working plans for Rajura sub Division forests was under preparation for almost 4 years.The working plan is very important document for management, conservation and protection of forests with an aim of sustained yield, considering the demand, protection of rights and privileges of local population. The working plan is generally prepared for management of forests for next 10 years after in detail inspection of each compartments forests.

A senior Forest Officer of the rank of I.F.S. are given this job with sufficient staff to his disposal. The working and management of forests are carried out as per the prescriptions prescribed in the sanctioned working plans.There were two working plans offices at Chandrapur, one for North Chandrapur circle and other for South Chandrapur circle at that time. The post of Working Plans officer of our circle (South) was vacant, so C. F. W.P. Nagpur entrusted this job of completing the work to the Working Plans Officer, Nagpur , who on the basis of field work done by earlier officers completed and finalised the work .

A meeting was held under the chairmanshipofPCCF, M. S. at Nagpur on 31/3/1993 for approval of working plan. I attended this meeting as our Dy.C.F. was in U.K. for training. The document was approved after discussion in the meeting and it was decided to send the same to GOI for sanction after getting approval from Collector, Chandrapur as per the procedure.

Accordingly,Conservator of Forest sent the copy of working plan to the Collector through the R.F.O. of his office to the Collector with request letter for his approval. However Collector informed that the Working Plan Officer to attend his office for discussion.

Here I would like to narrate an unpleasant incident that had happened few months ago at Chandrapur between Collector and Working Plans Officer, [North] over a piece of land belonging to the premises of working plan office.Both the officers being equally aggressive, the spat and exchanges of few words turned into bad incident.However it was settled down by the intervention from senior officers.

Now, coming back to story; Conservator of Forests informed Dy.C.F. [T & M.] who was holding additional charge of our Division, to have a discussion with Collector for his approval. DyCF informed me to accompany with him. So we went to the Collector's office at an appointed day and time for discussion. As soon as we entered in his office, his first question was where is Mr [xxx] Working Plan Officer? We explained him that author of this book is officer from Nagpur and Mr. [xxx] is for North Chandrapur circle, so he has no role in this working plan.

On hearing this, the Collector was upset and disappointed, however he quickly came to composure [having lost the opportunity of settle the issue] gone through the few pages of workingplan routinely and asked few questions and after that signed the document.

We thanked him and left his office and headed for our office having long laugh. Collector may be wondering this North / South circle wonder of Forest Department.

---

## आई-वडिलांचेआई-वडीलहोताआलेपाहिजे

संकलन : प्रविण सरवदे, कराड

एक दिवस येतो आणि दोघांपैकी एकाला घेऊन जातो, जो जातो तो सुटतो, परीक्षा असते मागे राहणाऱ्याची कोण अगोदर जाणार ? कोण नंतर जाणार हे तर देवालाच माहीत, जो मागे रहातो त्याला आठवणी येणं, अश्रू येणं हे अगदी स्वाभाविक असतं.

आता प्रश्न असा असतो की ही आसवं हे रडणं थांबवायचं कुणी ?

मागे राहिलेल्या आईला किंवा वडिलांना कुणी जवळ घ्यायचं ? पाठीवरून हात कुणी फिरवायचा? निश्चितपणे ही जवाबदारी असते- मुलांची, मुलींची, सुनांची.

थोडक्यात काय तर दोघांपैकी एकजण गेल्यानंतर मुलामुलींनाच आपल्या आई वडिलांचे आईवडिल होता आलं पाहिजे.

लक्षात ठेवा, लहानपणी आई वडिलांनी नेहमी अश्रू पुसलेले असतात, आजारपणात अनेक रात्री जागून काढलेल्या असतात, स्वतः उपाशी राहून, काहीबाही खाऊन आपल्याला आवडीचे घास भरवलेले असतात, परवडत नसलेली खेळणी आणि आवडीचे कपडे घेतलेले असतात.

म्हणून आता ही आपली जवाबदारी असते, त्यांच्या सारखच निस्वार्थ प्रेम करण्याची असं झालं तरच ते जगू शकतील नसता तो माणूस म्हणजे वडील किंवा ती स्त्री म्हणजे आई तुटून जाऊ शकते, कोलमडून पडू शकते.
आणि ही जवाबदारी फक्त मुलं, मुली आणि सुना यांचीच असते असे नाही, तर ती जवाबदारी प्रत्येक नातेवाईकाची, परिचिताची, मित्र मैत्रिणींची सर्वांची असते.

फक्त छत, जेवणखाणं आणि सुविधा देऊन ही जबाबदारी संपत नाही तर अशा व्यक्तींना आपल्याला वेळ आणि प्रेम द्यावेच लागेल तरंच ही माणसं जगू शकतील.आयुष्याचा जोडीदार गमावणं म्हणजे नेमकं काय ? हे दुःख शब्दांच्या आणि अश्रूंच्या खूप खूप पलीकडचं असतं म्हणून अशा व्यक्तींना समजून घ्या, केवळ माया, प्रेम आणि आपुलकीचे दोन गोड शब्द एवढीच त्यांची अपेक्षा असते ती जरूर पूर्ण करा, त्यांच्या जागी आपण आहोत अशी कल्पना करा आणि त्यांना वेळ द्या.उद्या हा प्रसंग कोणावरही येऊ शकतो, म्हणून नेहमी सर्वांशी प्रेमाने, मायेने आणि आपुलकीने वागा,

## माझी फोटोग्राफी -५

**प्रमोद यादव**

आज तारीख 25.09. 2025. आजचा ट्रेक बारा किलोमीटरचा होता.हा ट्रेक पूर्ण करून 14470 फूट उंचीवर डेंगबोचे (dengboche) येथे पोहोचायचे होते.उद्याचा ट्रेक कसा असणार आहे याबाबत टूर गाईड मिहीर अगोदर सांगत असे.
सकाळचा नाष्टा कोणास काय हवे याबद्दलचे देखील अगोदरच विचारणा केली जात असे. कारण हॉटेलमध्ये आपण जो नाष्टा कळवला आहे तोच मिळत असे. कारण तेथे अशी सेवा देणे कठीणच असल्याने जे तेथे मिळत होते ते नक्कीच अनमोल होते. फक्त ते महाग होते .आजचा ट्रेक डेबोचे ते डेंगबोचे असा होता,नदीच्या काठानेच आमचा ट्रेक सुरू झाला. सुरुवातीला नदीवरील झुलता पूल क्रॉस केला. आणि नंतर सुरू झाली मोठी चढण. वाटेतइमजा खोला स्तूपलागला त्याचा फोटो सोबत मी टाकला आहे.

पुढे चढून गेल्यानंतर काही वेळातच म्हणजे तीन तास चालून ट्रेक पूर्ण करताना वाटेत पेंगबोचे (Pengboche ) येथे चहा आणि अर्ध्या तासाची विश्रांतीघेण्यासाठी थांबलो. त्या वेळेतमित्रामध्ये मनुके, खजूर, बदाम वाटप झाल्याने ते खाऊन अर्ध्या तासात आमचा पुढील ट्रेक सुरू झाला.संपूर्ण ट्रेक मध्येबऱ्याच ठिकाणी तेथील स्थानिक लोक शेती करतात ते पाहीले . सर्व शेती डोंगर उतारावर व काही थोडीसपाट जमीन आहे तेथे पिकवली जाते .

त्यामध्ये प्रामुख्याने गहू भात बटाटा, कोबी पत्ता तसेच काही ठिकाणी टोमॅटो तर काही तेथे येणारा भाजीपाला ते पिकवतात. पण ही शेती बहुतेक अंग मेहनतीनेच करावी लागत होती. प्रत्येक शेतात चार-पाच लोक एकत्र येऊन शेतीची मशागत करताना दिसत होते. तेथील पत्ता कोबी व तेथील स्थानिक भाज्या अत्यंत तजेलदार दिसत होत्या . वाटेतजिथे शेती होती त्या बऱ्याच ठिकाणी तो लावलेला दिसला .
आज ट्रेक वर साधारण चढण होती . पणऑक्सिजन विरळ होत गेल्याने प्रचंड दमछाक होत होती. आणि चालताना त्रास होत असे.

दूरवरून पाहिलेला अमादबलम हे हिमालयातील उंच शिखर समोरच दिसत होते. त्याची उंची 6812 मीटर असून ते पाहताच हिमालयाची भव्यता किती मोठी आहे हे जाणवत होते. आजचा आमचा मुक्काम हॉटेल सुमितला होता. डेंगबोचेतेथील बऱ्यापैकी हॉटेल असणारे ठिकाण होते. अति उंचीवर गेल्यामुळे जरी थकवा आला असला तरी उद्याचा दिवस विश्रांतीसाठी असतो तो राखूनठेवलेला होता. कारण शरीराला हावमाना शी जुळाऊन घेणे सुसंगत करणे खूप गरजेचे असते.

आता येथून पुढे फोटोग्राफीमध्ये हिमालयातील शिखरे आणि त्याची भव्यता हेच फोटो मिळणार होते. वाटेत आता झाडे भेटत नव्हती. कारण अतिउंच ठिकाणावर आमचा ट्रेकसुरू झालेला होता. एकंदरीत आज डेबोचे ते डिंगबोचेअंतर नेहमीप्रमाणेच हळू चालत ट्रेक पूर्ण केला. साडे पाच वाजले होते. नदीची साथ वाटेत होती.काही ठिकाणी हिमालयातील लँड स्लाईड झाल्याने तेथे स्पष्ट दिसत होते.असे झाल्याने काही ठिकाणी मोठी तळी तयार होतात. हे काश्मीरमधील 7 लेक ट्रेक मध्ये पाहिले होते.

हॉटेल सुमितला पोहोचलो खूप थकवा आलेला होता कारण ऑक्सीजन कमतरता .खूप थकवा आल्याने रूममध्ये आराम करत बसलो. आता जेवणाची वाट पाहत थांबायचे होते . पण जेवण अजिबातच खाण्याची इच्छा होत नव्हती .झोप तर येणे कठीणच होते. मागील अनुभव तसा होता . त्यात हवामान बदल होत असे. त्यामुळे शरीर योग्य साथ देत नसे.आपोआपच शरीरामध्ये कब तयार होऊ लागलाहोता. त्यामुळे पुढचे दिवस कसे जातील काही समजत नव्हते.
क्रमशः







## आरोग्यसाधना

### कोल्ड-प्रेस्ड तेल

कमी उत्पादन आणि जास्त श्रम लागणाऱ्या प्रक्रियेमुळे कोल्ड-प्रेस्ड तेल सर्वात महाग असते,
तर उच्च-तापमानाच्या रासायनिक प्रक्रियेद्वारे तयार होणारे रिफाइंड तेल सर्वात स्वस्तही असते.
फिल्टर केलेले (किंवा अनरिफाइन्ड) तेल या दोन्हींच्या मध्ये येते, जे माफक किमतीत रिफाइंड तेलाला अधिक नैसर्गिक पर्याय ठरते. गाळलेले तेल (मध्यम किंमत): कोल्ड-प्रेस केलेल्या तेलापेक्षा स्वस्त पण रिफाइंड तेलापेक्षा महाग, कारण यावर रासायनिक प्रक्रिया करण्याऐवजी केवळ यांत्रिकरित्या गाळणी केली जाते.
कोल्ड-प्रेस्ड तेलमध्ये अँटीऑक्सिडंट्स आणि नैसर्गिक सुगंध टिकून राहतो.
शुद्ध तेलासाठी रसायने आणि उच्च उष्णतेचा वापर केला जातो; कोल्ड-प्रेस्ड तेलासाठी यांत्रिक दाबाचा वापर केला जातो; फिल्टर्ड तेलासाठी, फार तर, साध्या गाळणीचा वापर केला जातो.

*आरोग्य:
कोल्ड-प्रेस केलेले तेल पोषक तत्वांनी परिपूर्ण असते. रिफाइंड तेलांमधील पोषक तत्वे प्रक्रियेदरम्यान कमी होतात आणि अनेकदा ती अधिक पौष्टिक बनवली जातात, तर फिल्टर केलेल्या तेलांमध्ये अधिक नैसर्गिक पोषक तत्वे टिकून राहतात.

वापर:
रिफाइंड तेल तळण्यासाठी उत्तम आहे .
कोल्ड-प्रेस्ड तेल कमी आचेवर स्वयंपाक करण्यासाठी, सॅलडसाठी आणि पदार्थांना चव आणण्यासाठी सर्वोत्तम आहे.
कोल्ड-प्रेस केलेले तेल अधिक महाग का असते ?
कमी तेल उत्पादन: औद्योगिक द्रावकांच्या तुलनेत पारंपरिक, यांत्रिक पद्धतींद्वारे प्रति किलोग्राम बियांमधून कमी तेल मिळते.
श्रम आणि वेळ: कोल्ड-प्रेस्ड एक्स्ट्रॅक्शनला जास्त वेळ लागतो, ज्यामुळे उत्पादन खर्च वाढतो.
रासायनिक पदार्थ नाहीत: तीव्र रसायने आणि शुद्धीकरण घटकांच्या अभावामुळे गुणवत्ता टिकून राहते, परंतु उत्पादन खर्च वाढतो.

## वाचक प्रतिक्रिया -सेवक वार्ता, मार्च-२०२६

*नेहमी प्रमाणेच परिपूर्ण अंक.नविन कार्यकारिणी चे हार्दिक अभिनंदन. पुर्वी नियमीतपणे वार्षिक सर्वसाधारण सभा पुण्यात होत असे. त्यामुळे अनेक जेष्ठ सभासदाना उपस्थित राहणे शक्य होत असे. याबाबत जरुर विचार व्हावा. वृत्त स्तरावर समन्वयक नेमल्याने श्री गवळी यांना मदत होईल अशी अपेक्षा आहे. माझे मत, व पर्यावरण वानिकी संबधित व्यक्तिगत माहिती, सुंदर फोटोग्राफ्स कलरफुल अंक. गवळी साहेबांसाठी शब्द सुमन अपुर्ण आहेत.-पी. एन. कुकडोलकर

## वेधक वृत्त

### नवीन सदस्य

श्री. मनोहरआनंदा सैंदाणे, सेवा निवृत्त विभागीय वन अधिकारी, रा. पुणे यांनी आजीवन सेवा शुल्क धुळे शाखेचे बँकेतील बचत खात्यात इंटरनेट बँकिंग प्रणाली द्वारे जमा करून धुळे शाखेत आजीवन सदस्य स्वीकारले आहे.

श्री. घनश्याम गुलाबराव उपासे, निवृत्त रेंजर वन सर्वेक्षक ,अमरावती. आजीवन सेवक सदस्य झाले आहेत.
त्यांचे सेवक संघ परिवारात सहर्ष स्वागत.

### *निधन वार्ता*

श्री. इंद्रजीत निकम, विभागीय वन अधिकारी (नियोजन) कोल्हापूर वनवृत्त यांचे दि.२३-४-२०२६रोजी (वय ४४वर्षे) हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले.ते राहुरी कृषि विद्यापीठाचे एम.एस्सी. पदवीधारक होते. त्यांची वन विभागात वनक्षेत्रपाल पदावर १२ वर्षापुर्वी नियुक्ती झाली होती व नुकतीच विभागीय वन अधिकारी पदान्नतीही झाली होती. केवळ अधिकारीच नव्हे तर, प्रत्येकाला आपलेपणाने सांभाळून घेणारे व मार्गदर्शन करणारे आणि माणुसकी जपणारे व्यक्तिमत्व होते. अशा मनमिळावू व सहकार्य शील आणि कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याचे अकाली जाणे ही वन विभागासाठीच नव्हे तर सर्वांच्या मनासाठी मोठी पोकळी निर्माण करणारी घटना आहे.त्यांच्या मागे आईए पत्नी, दोन मुले असा परिवार आहे. व्हण्णूर ता. कागल येथे त्यांचवर अंत्य संस्कार करणेत आले. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो आणि त्यांच्या कुटुंबियांना हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो हीच प्रार्थना. सेवक परिवार त्यांच्या कुटुबीयांच्या दुःखात सहभागी आहे. त्यांना सेवक संघ परिवारातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली.

**माणसाला माणसेच काय, परंतु झाडेसुध्दा मोठी झालेली चालत नाही.**

केवळ खाजगी वितरणासाठी
प्रकाशक-सेवक संघ, महाराष्ट्र, पुणे
संपादन - एस. के. गवळी
कार्यालय- वनग्रंथालय, दुसरामजला,वनभवन, भांबुर्डावनविहार, गोखलेनगर,पुणे - १६